**महाराष्ट्र शासन**

क्र. अधापु- २०१६/ प्र.क्र. २२/ना.पु.-२२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ फेब्रुवारी, २०१६.

प्रति,

१) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
२) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
३) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी (सर्व जिल्हे),
४) अन्नधान्य वितरण अधिकारी (पुणे, नागपूर, सोलापूर),

**विषय** :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी **माहे एप्रिल, २०१६ ते जून, २०१६** कालावधीकरिता वितरित करावयाच्या अन्नधान्याचे नियमित मासिक नियतन.

**संदर्भ** :- केंद्र शासनाचे क्र. १-८/२०१३-बीपी-III, दि. १०/१२/२०१४ चे पत्र.

केंद्र शासनाने संदर्भाधीन दि. १०.१२.२०१४ च्या पत्रान्वये मंजूर केलेल्या सुधारीत नियतनाच्या मर्यादेत राज्यातील जिल्हयांना अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता माहे एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ साठी याद्वारे नियतन मंजूर करण्यात येत आहे. जिल्हानिहाय मासिक नियतनाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्र **"अ" व "ब"** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**दि. १७.१२.२०१३ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" व "ब" अन्वये ठरवून दिलेला इष्टांक रद्द करुन दि. २४.३.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये (दि. २८.५.२०१५ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये सोलापूर जिल्ह्याकरिता) राज्यातील ग्रामीण व शहरी भागाकरिता सुधारीत इष्टांक देण्यात आला आहे. तसेच दि. ३०.३.२०१५ च्या पत्रान्वये अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकांचा सुधारीत इष्टांक देण्यात आला आहे. उपरोक्त दि. ३०.३.२०१५ च्या पत्रासोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्रमांक ३ मधील अंत्योदय अन्न योजनेच्या सुधारीत इष्टांकानुसार व दि.२४.३.२०१५ च्या शासन परिपत्रकासोबतच्या विवरणपत्र "अ" व "ब" मधील प्राधान्य कुटुंबाच्या लाभार्थ्यांच्या सदस्य संख्येच्या सुधारीत इष्टांकानुसार तसेच सोलापूर जिल्ह्याकरिता स्वतंत्रपणे दिलेल्या सुधारीत इष्टांकानुसार माहे एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ चे सदर नियतन देण्यात आले असल्याने उपरोक्त सुधारीत इष्टांकांची तत्काळ पुर्तता करण्यात यावी व त्यानुसार दिलेल्या नियतनापैकी आवश्यक असलेल्या अन्नधान्याची भारतीय अन्न महामंडळाकडून उचल करण्यात यावी. त्याअनुषंगाने अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता मंजूर करण्यात आलेल्या मासिक नियतनानुसार व विहित परिमाणाच्या मर्यादेत गहू व तांदळाचे वाटप करावे.**

२. सदर पत्रामध्ये नमूद केल्यानुसार माहे एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ च्या नियतनाच्या उचलीचा व रकमा जमा करण्याचा कालावधी हा विद्यमान सूचनांनुसारच राहील. तसेच शासनाच्या दि.२१.३.२०१३, दि. ३०.३.२०१३, दि.३.६.२०१३ व दि.४.६.२०१३ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचना कायम राहतील. अंतिम दिनांकाची वाट न पाहता विहित मुदतीत रक्कम जमा करुन, नियतनानुसार संपूर्ण धान्याची उचल करुन व

रु.३/- प्रतिकिलो दराने तांदूळ व रु.२/- प्रतिकिलो दराने गहू या सुधारित दराने प्रवर्गनिहाय निश्चित केलेल्या परिमाणात वाटप होईल याची दक्षता घ्यावी.

३. शासनाचे सदर नियतन मंजूरीचे आदेश ई-मेलद्वारे व उपआयुक्त (पुरवठा) यांना फॅक्स व ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. नियतन मंजूरीचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे धान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले, ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

**४. भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून गहू व तांदूळ स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी. यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सदर संयुक्त तपासणीच्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची नावे, त्यांचे पद व तपासणीचा दिनांक व स्थळ याबाबतची जिल्हानिहाय माहिती अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर तत्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासनाच्या नियतन आदेशापूर्वी प्राप्त न झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

५. सदर अन्नधान्य राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कार्यपध्दती प्रमाणे वितरीत करण्याची दक्षता घेण्यात यावी. शिधापत्रिकाधारकास रास्तभाव धान्य दुकानांच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप विहित परिमाणात होत असल्याची खातरजमा करण्याबाबत संबंधितांना सूचना दयाव्यात. अन्नधान्याचे वाटप होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

६. सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, २००१ मधील तरतूदीनुसार "उपयोगिता प्रमाणपत्र" नियमितपणे सादर करणे अनिवार्य आहे.

७. सोबतच्या विवरणपत्रांतील नियतनाच्या तक्त्यांमध्ये दर्शविलेल्या परिमाणानुसारच लाभार्थ्यांना धान्याचे वितरण करणे अनिवार्य आहे.

८. माहे एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ साठी अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता नियतनानुसार गहू व तांदुळाचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्रपणे देण्यात आल्या आहेत.

९. मंजुर नियतनानुसार अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता गहू व तांदळाची उचल करुन वाटप करावे व केलेल्या उचल व वाटपाची माहिती न चुकता "महाफूड" आज्ञावलीत दर आठवडयास वेळीच भरावी. नियतन, उचल व वाटप यासंबंधीची माहिती वेबसाईटवर प्रदर्शित करण्याबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच भारतीय अन्न महामंडळाकडून केलेल्या उचलीबाबतची व रास्तभाव दुकानदारांनी केलेल्या उचलीबाबतची माहिती दररोज उपसंचालक, नागरी पुरवठा यांना सादर करावी.

**( स. श्री. सुपे )**
**शासनाचे उपसचिव**

सोबत:- विवरणपत्र **"अ" व "ब"**

प्रत:-

१) सर्व उप आयुक्त (पुरवठा) (फॅक्सद्वारे)

त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व जिल्हयांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्हयांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्हयांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती **"महाफूड"** आज्ञावलीत दर आठवडयास भरली जाण्याची योग्य ती दखल घ्यावी.

२) उपसंचालक, नागरी पुरवठा,पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई, यांनी प्रस्तुत नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील "महाफूड" आज्ञावलीद्वारेच प्राप्त करुन घ्यावा.

३) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करावी.

**( स. श्री. सुपे )**
**शासनाचे उपसचिव**

सोबत:- विवरणपत्र **"अ" व "ब"**

प्रत :- १) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

F:\Typist\NFSA Allocation\ALLOCATIONS 2016-2017\ALLOCATION April to June, 2016\NFSA Allocation April To June, 2016 CR.22-2016.docx

## विवरणपत्र "अ"

शासन पत्र क्र. अधापु-2016/प्र.क्र.22/नापु-22, दि. 18.2.2016 सोबतचे विवरणपत्र "अ"

**राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, 2013 अंतर्गत "प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यां" साठी माहे एप्रिल, 2016 ते जून, 2016 करिता नियतन**

| अ.क्र | जिल्हा | लाभार्थी सदस्यसंख्या | नियतनाचे परिमाण | | नियतन (मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | एकूण अन्नधान्य |
| 1 | 2 | 3 | | | 4 | 5 | 6 |
| 1 | मुंबई-ठाणे शि. वा. क्षेत्र | 9010747 | 3 | 2 | 27032 | 18022 | 45054 |
| 2 | ठाणे | 528772 | 2 | 3 | 1058 | 1586 | 2644 |
| 3 | पालघर | 1423595 | 2 | 3 | 2847 | 4271 | 7118 |
| 4 | रायगड | 1482074 | 2 | 3 | 2964 | 4446 | 7410 |
| 5 | रत्नागिरी | 1002427 | 2 | 3 | 2005 | 3007 | 5012 |
| 6 | सिंधुदुर्ग | 553682 | 2 | 3 | 1107 | 1661 | 2768 |
| 7 | नाशिक | 2984928 | 3 | 2 | 8955 | 5970 | 14925 |
| 8 | धुळे | 1099942 | 3 | 2 | 3300 | 2200 | 5500 |
| 9 | जळगांव | 2214290 | 3 | 2 | 6643 | 4429 | 11072 |
| 10 | नंदूरबार | 665432 | 2 | 3 | 1331 | 1996 | 3327 |
| 11 | अहमदनगर | 2795318 | 3 | 2 | 8386 | 5591 | 13977 |
| 12 | पुणे ग्रामीण | 2815596 | 3 | 2 | 8447 | 5631 | 14078 |
| 13 | पुणे शहर | 2128181 | 3 | 2 | 6385 | 4256 | 10641 |
| 14 | सोलापूर ग्रामीण | 2108666 | 3 | 2 | 6326 | 4217 | 10543 |
| 15 | सोलापूर शहर | 426760 | 3 | 2 | 1280 | 854 | 2134 |
| 16 | कोल्हापूर | 2358152 | 3 | 2 | 7074 | 4716 | 11790 |
| 17 | सांगली | 1709348 | 3 | 2 | 5128 | 3419 | 8547 |
| 18 | सातारा | 1792020 | 3 | 2 | 5376 | 3584 | 8960 |
| 19 | औरंगाबाद | 1960483 | 3 | 2 | 5881 | 3921 | 9802 |
| 20 | जालना | 1196173 | 3 | 2 | 3589 | 2392 | 5981 |
| 21 | नांदेड | 1927402 | 3 | 2 | 5782 | 3855 | 9637 |
| 22 | बीड | 1640308 | 3 | 2 | 4921 | 3281 | 8202 |
| 23 | उस्मानाबाद | 998251 | 3 | 2 | 2995 | 1997 | 4992 |
| 24 | परभणी | 1005199 | 3 | 2 | 3016 | 2010 | 5026 |
| 25 | लातूर | 1479417 | 3 | 2 | 4438 | 2959 | 7397 |
| 26 | हिंगोली | 713674 | 3 | 2 | 2141 | 1427 | 3568 |
| 27 | अमरावती | 1354966 | 3 | 2 | 4065 | 2710 | 6775 |
| 28 | वाशिम | 680407 | 3 | 2 | 2041 | 1361 | 3402 |
| 29 | अकोला | 935258 | 3 | 2 | 2806 | 1871 | 4677 |
| 30 | बुलढाणा | 1540103 | 3 | 2 | 4620 | 3080 | 7700 |
| 31 | यवतमाळ | 1438183 | 3 | 2 | 4315 | 2876 | 7191 |
| 32 | नागपूर ग्रामीण | 1166890 | 3 | 2 | 3501 | 2334 | 5835 |
| 33 | नागपूर शहर | 920761 | 3 | 2 | 2762 | 1842 | 4604 |
| 34 | वर्धा | 735661 | 3 | 2 | 2207 | 1471 | 3678 |
| 35 | भंडारा | 548942 | 2 | 3 | 1098 | 1647 | 2745 |
| 36 | गोंदिया | 605645 | 2 | 3 | 1211 | 1817 | 3028 |
| 37 | चंद्रपूर | 874092 | 3 | 2 | 2622 | 1748 | 4370 |
| 38 | गडचिरोली | 394286 | 2 | 3 | 789 | 1183 | 1972 |
| राज्याची एकूण | | 59216031 | | | 170444 | 125638 | 296082 |

| विवरणपत्र "ब" | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शासन पत्र क्र. अधापु- 2016/प्र.क्र.22/नापु-22, दि. 18.2.2016 सोबतचे विवरणपत्र "ब" | | | | | | | |
| राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, 2013 अंतर्गत "अंत्योदय अन्न योजने" तील लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल, 2016 ते जून, 2016 करिता नियतन | | | | | | | |
| अ.क्र | जिल्हा | कार्डसंख्या | नियतनाचे परिमाण | | नियतन (मे.टन) | | |
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | एकूण अन्नधान्य |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | मुंबई-ठाणे शि. वा. क्षेत्र | 19251 | 17 | 18 | 327 | 346 | 673 |
| 2 | ठाणे | 46970 | 10 | 25 | 469 | 1174 | 1643 |
| 3 | पालघर | 97828 | 10 | 25 | 978 | 2445 | 3423 |
| 4 | रायगड | 80897 | 10 | 25 | 808 | 2022 | 2830 |
| 5 | रत्नागिरी | 43857 | 10 | 25 | 438 | 1096 | 1534 |
| 6 | सिंधुदुर्ग | 24077 | 10 | 25 | 240 | 601 | 841 |
| 7 | नाशिक | 180711 | 21 | 14 | 3794 | 2529 | 6323 |
| 8 | धुळे | 76409 | 21 | 14 | 1604 | 1069 | 2673 |
| 9 | जळगांव | 136977 | 21 | 14 | 2876 | 1917 | 4793 |
| 10 | नंदूरबार | 105925 | 10 | 25 | 1059 | 2648 | 3707 |
| 11 | अहमदनगर | 93558 | 21 | 14 | 1964 | 1309 | 3273 |
| 12 | पुणे ग्रामीण | 56604 | 21 | 14 | 1188 | 792 | 1980 |
| 13 | पुणे शहर | 15707 | 21 | 14 | 329 | 219 | 548 |
| 14 | सोलापूर ग्रामीण | 77811 | 21 | 14 | 1633 | 1089 | 2722 |
| 15 | सोलापूर शहर | 7204 | 21 | 14 | 151 | 100 | 251 |
| 16 | कोल्हापूर | 62300 | 21 | 14 | 1308 | 872 | 2180 |
| 17 | सांगली | 36708 | 21 | 14 | 770 | 513 | 1283 |
| 18 | सातारा | 35884 | 21 | 14 | 753 | 502 | 1255 |
| 19 | औरंगाबाद | 73906 | 21 | 14 | 1552 | 1034 | 2586 |
| 20 | जालना | 42979 | 21 | 14 | 902 | 601 | 1503 |
| 21 | नांदेड | 82173 | 21 | 14 | 1725 | 1150 | 2875 |
| 22 | बीड | 43130 | 21 | 14 | 905 | 603 | 1508 |
| 23 | उस्मानाबाद | 39172 | 21 | 14 | 822 | 548 | 1370 |
| 24 | परभणी | 45034 | 21 | 14 | 945 | 630 | 1575 |
| 25 | लातूर | 41362 | 21 | 14 | 868 | 579 | 1447 |
| 26 | हिंगोली | 32248 | 21 | 14 | 677 | 451 | 1128 |
| 27 | अमरावती | 123791 | 20 | 15 | 2475 | 1856 | 4331 |
| 28 | वाशिम | 41624 | 20 | 15 | 832 | 624 | 1456 |
| 29 | अकोला | 47064 | 20 | 15 | 941 | 705 | 1646 |
| 30 | बुलढाणा | 65929 | 20 | 15 | 1318 | 988 | 2306 |
| 31 | यवतमाळ | 114292 | 20 | 15 | 2285 | 1714 | 3999 |
| 32 | नागपूर ग्रामीण | 69737 | 20 | 15 | 1394 | 1046 | 2440 |
| 33 | नागपूर शहर | 34776 | 20 | 15 | 695 | 521 | 1216 |
| 34 | वर्धा | 44241 | 20 | 15 | 884 | 663 | 1547 |
| 35 | भंडारा | 64249 | 10 | 25 | 642 | 1606 | 2248 |
| 36 | गोंदिया | 76561 | 10 | 25 | 765 | 1914 | 2679 |
| 37 | चंद्रपूर | 132612 | 20 | 15 | 2652 | 1989 | 4641 |
| 38 | गडचिरोली | 91742 | 10 | 25 | 917 | 2293 | 3210 |
| राज्याची एकूण | | 2505300 | | | 44885 | 42758 | 87643 |

<u>**Government of Maharashtra**</u>

No.- ADHAPU-2016/C.R.22/CS-22,
Food, Civil Supplies & Consumer Protection Department, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralay Annex, Mumbai-400 032
Date :- 18th February, 2016.

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD Complex,
Dattapada Road, Rajendra Nagar,
Boriwali (E), Mumbai- 400 066.

**Sub :- Monthly Allocation of Foodgrains for Priority Households & AAY Category under NFSA, 2013 for the month of April, 2016 to June, 2016.**

**Ref :-** 1) Govt. of India letter No. 1-8/2013.BP.III, Dtd. 10.12.2014
2) State Govt. Letter of even no. Dtd. 18th February, 2016.

Sir,

Government of India vide its above referred letter dated 10.12.2014 has sanctioned revised monthly allocation for Priority households & AAY category under NFSA, 2013 for the month of January, 2015 and onwards. Accordingly State Government has issued districtwise allocation orders for the month of April, 2016 to June, 2016 vide above referred letter dated 18th February, 2016 (copy enclosed).

You are therefore requested to release the allocated quota for Priority households & AAY category to the nominees of District Collector's and Controller of Rationing, Director, Civil Supplies, Mumbai as per the statement attached under intimation to this Government.

Yours faithfully,

**(S. S. Supe)**
**Deputy Secretary,**
**Government of Maharashtra**

Copy to: 1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S & C.P. Dept, Mumbai.
2) Select file, Desk CS-22.

F:\Typist\NFSA Allocation\ALLOCATIONS 2016-2017\ALLOCATION April to June, 2016\NFSA Allocation April To June, 2016 CR.22-2016.docx